# मार्गदर्शक सुचना

केंद्र पुरस्कृत परंपरागत कृषि विकास योजना वर्ष २०२२-२३ च्या अंमलबजावणी बाबत मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहेत. या मार्गदर्शक सूचना डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशनच्या अंमलबजावणीच्या अनुभवाच्या आधारे वर्ष २०२२-२३ मधील मंजुर ५०० गटांसाठी वर्ष २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६ मध्ये प्रत्यक्ष कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी बाबनिहाय निर्गमित करण्यात येत आहेत.

योजनेअंतर्गत २० हे. क्षेत्राचा एक व अशा १५ गटांचा ३०० हे. क्षेत्राचा एक समुह व त्या समुहाची शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करावयाची आहे.

**१. बाब ए-१ क्लस्टर निर्मिती आणि क्षमता निर्माण करणे, क्षेत्रीय भेटी/ क्षेत्रीय पातळीवरील कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण -**

| स्तर | वर्षनिहाय उपलब्ध तरतुद (रूपये) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकुण तीन वर्षाकरिता तरतुद | पहिले वर्ष उपलब्ध तरतुद | पहिले वर्ष खर्च | पहिले वर्ष शिल्लक | दुसरे वर्ष उपलब्ध तरतुद | दुसऱ्या वर्षासाठी एकूण उपलब्ध तरतूद | तिसरे वर्ष उपलब्ध तरतुद |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ (५+६) | ८ |
| प्रति हेक्टर | ३,००० | १,००० | ८०० | २०० | १,००० | १,२०० | १,००० |
| प्रति गट (२०हेक्टर) | ६०,००० | २०,००० | १६,००० | ४,००० | २०,००० | २४,००० | २०,००० |
| प्रति समुह (१५ गटांचे ३०० हे.) | ९,००,००० | ३,००,००० | २,४०,००० | ६०,००० | ३,००,००० | **३,६०,०००** | ३,००,००० |

या घटकांतर्गत प्रति हेक्टर प्रति वर्ष रू. १,०००/- प्रमाणे तीन वर्षासाठी रू. ३,०००/- आणि प्रति गट प्रति वर्ष रू. २०,०००/- प्रमाणे तीन वर्षासाठी एकुण रू. ६०,०००/- आणि प्रति ३०० हेक्टरच्या एका समुहासाठी (१५ गट) प्रति वर्ष रू. ३,००,०००/- असे एकुण तीन वर्षासाठी रू. ९,००,०००/- इतकी तरतुद उपलब्ध आहे.

वर्ष २०२२-२३ मध्ये या बाबीसाठी रू. ८००/- प्रति हेक्टर इतकी तरतुद उपलब्ध करून देण्यात आलेली होती. आता वर्ष २०२३-२४ साठीचे रू. १,०००/- आणि वर्ष २०२२-२३ मधील उर्वरीत राहिलेले रू. २००/- याप्रमाणे एकुण रू. १,२००/- प्रति हेक्टर याप्रमाणे प्रति गट रु. २४,०००/- आणि प्रति समुह एकुण रू. ३,६०,०००/- इतकी तरतुद वर्ष २०२३-२४ मध्ये खर्चासाठी उपलब्ध आहे. तसेच वर्ष २०२४-२५ मध्ये या बाबीसाठी उपलब्ध होतील. या तरतुदीतुन खालीप्रमाणे खर्च करण्यात यावा.

| अ.क्र | बाब | मापदंड (रक्कम रू) | अंमलबजावणी वर्ष | तरतुद प्रति समुह (१५ गटासाठी) (रक्कम रू.) | शेरा |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| १ | तज्ञ प्रशिक्षकांचे (Master Trainer) प्रशिक्षण | रू. १,५००/- प्रति दिन प्रति प्रशिक्षणार्थी प्रमाणे ५ दिवसांचे प्रशिक्षणासाठी रू. ७,५००/- आणि प्रवास खर्च व इतर अनुषंगीक खर्चासाठी रू. २,५००/- असे एकुण प्रति प्रशिक्षणार्थी रू. १०,०००/- | २०२३-२४ | १०,०००/- | हे प्रशिक्षण डॉ.पं.दे. जैविक शेती मिशन मार्फत आयोजित करण्यात येईल आणि हे अनुदान राज्यस्तरावरुन मिशन कार्यालयास देण्यात येईल. प्रवास खर्च व इतर अनुषंगिक खर्चासाठीची रक्कम रु. २,५००/- मिशन कार्यालयाने प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर लगेच द्यावे. |
| २ | अंतर्गत नियंत्रण निरीक्षकांचे (ICS Inspector) प्रशिक्षण | रू. १,५००/- प्रति दिन प्रति प्रशिक्षणार्थी प्रमाणे ३ दिवसांचे प्रशिक्षणासाठी रू. ४,५००/- आणि प्रवास खर्च व इतर अनुषंगीक खर्चासाठी रू. २,५००/- असे एकुण प्रति प्रशिक्षणार्थी रू. ७,०००/- अशा एका समुहाच्या ५ प्रशिक्षणार्थीसाठी रू. ३५,०००/- | २०२३-२४ | ३५,०००/- | हे प्रशिक्षण डॉ.पं.दे. जैविक शेती मिशन मार्फत आयोजित करण्यात येईल आणि हे अनुदान राज्यस्तरावरुन मिशन कार्यालयास देण्यात येईल. प्रवास खर्च व इतर अनुषंगिक खर्चासाठीची रक्कम रु. २,५००/- मिशन कार्यालयाने प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर लगेच द्यावे. |

| अ.क्र | बाब | मापदंड (रक्कम रू) | अंमलबजावणी वर्ष | तरतुद प्रति समुह (१५ गटासाठी) (रक्कम रू.) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ३ | समुह स्तरावरील शेतकरी उत्पादक कंपनीच्या संचालकांसाठी प्रशिक्षण | रू. ५००/- प्रति दिन प्रति प्रशिक्षणार्थी प्रमाणे ३ दिवसांचे प्रशिक्षणासाठी रू. १,५००/- असे एकुण १० प्रशिक्षणार्थीसाठी रू. १५,०००/- | २०२३-२४ | १५,०००/- | हे प्रशिक्षण प्रकल्प संचालक, आत्मा यांनी रामेती किंवा कृषि विज्ञान केंद्र अथवा तत्सम संस्थेमार्फत अथवा स्वत: आयोजित करावे. यासाठी मार्गदर्शनार्थ स्मार्ट प्रकल्पांतर्गत शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या संचालकांच्या प्रशिक्षणासाठी तयार करण्यात आलेले मोडयुल वापरावेत आणि त्याव्यतिरिक्त आवश्यक त्या विषयांचा समावेश प्रशिक्षणात करावा. |
| ४ | गावपातळीवरील शेतकरी प्रशिक्षण | एका गटाच्या (२० हे.) एक दिवसाच्या प्रशिक्षण सत्रासाठी रू. ४,०००/- प्रमाणे खर्च करावे. एका गटाच्या एकुण ५ प्रशिक्षणासाठी रू. २०,०००/- प्रमाणे अनुदान उपलब्ध आहे.<br>एकुण १५ गटाच्या ५ प्रशिक्षण सत्रासाठी रू. २०,००० x १५ = रू. ३,००,०००/- इतके अनुदान वर्ष २०२३-२४ मध्ये उपलब्ध आहे. तसेच वर्ष २०२४-२५ मध्येही रु. ३,००,०००/- उपलब्ध होतील. | २०२३-२४ व २०२४-२५ | ३,००,०००/- + ३,००,०००/- | हे प्रशिक्षण समुह स्तरावरील प्रशिक्षित तज्ञ प्रशिक्षक, प्रशिक्षित बी.टी.एम/ ए.टी.एम आणि प्रशिक्षित अंतर्गत नियंत्रण निरीक्षकां मार्फत प्रकल्प संचालक, आत्मा हे गावपातळीवर आयोजित करतील. दर दोन महीन्यांनी एक या प्रमाणे वर्ष २०२३-२४ या वर्षात ५ प्रशिक्षणे आयोजित करावेत. एका प्रशिक्षण सत्रात ५ गटातील सर्व शेतकऱ्यांचा समावेश असावा. |
| | **एकुण** | | -- | ६,६०,०००/- | -- |

**गावपातळीवरील शेतकरी प्रशिक्षण खर्चाच्या बाबी -**

गावपातळीवरील प्रशिक्षणे घेण्याची जबाबदारी संबंधित प्रशिक्षित बीटीएम/एटीएम व मास्टर ट्रेनर यांची राहील. एका सत्रात २० हे. च्या एकूण ५ गटातील शेतकऱ्यांचे प्रशिक्षण एकत्रित घ्यावे. म्हणजेच एका प्रषिक्षण सत्रासाठी रु. २०,०००/- उपलब्ध होतील. जिल्हास्तरावर अनुदान उपलब्ध असल्यास या खर्चासाठी रु. २०,०००/- प्रशिक्षणाची जबाबदारी असलेल्या क्षेत्रीय कर्मचाऱ्यास (बीटीएम/एटीएम) प्रशिक्षणापूर्वी अग्रीम स्वरुपात उपलब्ध करुन द्यावा. त्यानंतरच्या प्रशिक्षणापूर्वी अग्रीमाचे समायोजन करुन पुढील प्रशिक्षणासाठी अग्रीम द्यावा.

i. अल्पोपहार, भोजन व्यवस्था,
ii. प्रशिक्षण सुविधा, हॉल भाडे, ध्वनीक्षेपण, एलसीडी प्रोजेक्टर भाडे
iii. प्रशिक्षण आणि प्रात्यक्षिक साहित्य
iv. आवश्यकता भासल्यास शेतकऱ्यांचा प्रवास खर्च (गट वेगवेगळ्या दुरच्या गावात असल्यासच)
v. इतर आनुषंगीक बा**बी**

वर्ष २०२३-२४ व २०२४-२५ मध्ये वरीलप्रमाणे प्रत्येक वर्षी घ्यावयाच्या पाच प्रशिक्षणाचा कालावधी व विषय खालीलप्रमाणे असतील.

**पहिले प्रशिक्षण-** **हे** प्रशिक्षण खरीप हंगामपूर्व मे/जुन महिन्यात पेरणीपुर्वी प्रशिक्षण घेण्यात यावे व त्यात पुढील विषयांचा अंतर्भाव असावा.

यामध्ये योजनेची व सेंद्रिय शेतीची संकल्पना, उद्देश आणि कार्यपध्दती विषद करावी, या योजनेतुन समूहस्तरावर स्थापन करावयाच्या एफपीओबाबत संकल्पना व कार्यपध्दती, पिक नियोजन, सापळा पिके, बिजप्रक्रीया, आंतरपिक लागवड, मुलस्थानी जलसंधारण, माती व पाणी परीक्षणाचे महत्व, स्वनिर्मित निविष्ठा उत्पादन व वापर, पिक अवशेषांचे कंपोस्ट करणे इ. बाबत प्रात्यक्षिकासह माहीती द्यावी. या प्रशिक्षणात शेतकरी दैनंदिनी वितरीत करावी व त्यात घ्यावयाच्या नोंदीचे महत्व स्पष्ट करून सांगावे.

**दुसरे प्रशिक्षण-** हे प्रशिक्षण खरीप मध्य हंगामात जुलै/ऑगस्ट महिन्यात घेण्यात यावेत व त्यात पुढील विषयांचा अंतर्भाव असावा.

सेंद्रिय शेती पध्दतीनुसार किड व रोग नियंत्रणासाठी निविष्ठा उत्पादन व वापर, तण नियंत्रण, कामगंध सापळे, पिवळे चिकट सापळे, पक्षीथांबे ई. चा वापर, जमिनीत सुक्ष्मजीवाणुचा वापर, सेंद्रिय प्रमाणीकरण कार्यपध्दती, शेतकरी दैनंदिनीत नोंदी करणे, सेंद्रिय माल व्यवसाय आराखडा इ. विषयांचा प्रशिक्षणात समावेश करावा.

**तिसरे प्रशिक्षण-** हे प्रशिक्षण सप्टेंबर/ऑक्टोबर महिन्यात घेण्यात यावेत व त्यात पुढील विषयांचा अंतर्भाव असावा.

स्वनिर्मित सेंद्रिय पध्दतीची पिक वृध्दीवर्धके (PGR) (उदा. मत्स्यजनीत व अंडेजनीत ॲमीनो ॲसीड, पंचगव्ये इ.) शेतातील किड व रोग निरीक्षण व सर्वेक्षण, सेंद्रिय प्रमाणीकरण मानके, शेतकरी दैनंदिनीत नोंदी करणे, पुढील हंगामाची पूर्व तयारी व नियोजन करणे.

**चौथे प्रशिक्षण-** हे प्रशिक्षण नोव्हेंबर/ डिसेंबर महिन्यात मध्ये घेण्यात यावे व त्यात पुढील विषयांचा अंतर्भाव असावा.

सेंद्रिय पध्दतीचे काढणी पश्चात तंत्रज्ञान, साठवणूक, मालाची प्रतवारी, विपणन व्यवस्थापन, सेंद्रिय माल व्यवसाय आराखडयानुसार विपणनासाठी असलेले राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मानके इ.

**पाचवे प्रशिक्षण-** हे प्रशिक्षण जानेवारी/फेब्रुवारी महिन्यात घेण्यात यावेत व त्यात पुढील विषयांचा अंतर्भाव असावा.

शेतकरी उत्पादक कंपनी व गटांचे ऑडीट, अभिलेख व्यवस्थापन, सेंद्रिय प्रमाणीकरण यंत्रणेने दिलेल्या त्रुटींची पूर्तता व करावयाच्या सुधारणा, पॅकेजिंग व ब्रँडींग, शेतकरी उत्पादक कंपनीसाठी असलेल्या शासकीय योजना व त्याचे अभिसरण इ.

वरील प्रशिक्षणाबाबत नियोजन करताना स्थानिक परिस्थितीनुसार व गरजेनुसार विषयामध्ये बदल करता येईल. प्रशिक्षणाचे पूर्व नियोजन प्रकल्प संचालक, आत्मा यांनी कृषि संचालक, आत्मा व डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन यांना कळवावे.

## २. बाब ए.२- मनुष्यबळाची नेमणूक आणि योजना अंमलबजावणी तसेच डेटा व्यवस्थापन-

| स्तर | वर्षनिहाय उपलब्ध तरतुद (रुपये) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकुण तीन वर्षाकरिता तरतुद | पहिले वर्ष उपलब्ध तरतुद | पहिले वर्ष खर्च | दुसरे वर्ष तरतुद | तिसरे वर्ष तरतुद | चौथे वर्ष तरतुद |
| प्रति हेक्टर | ४,५०० | १,५०० | ०.०० | १,५०० | १,५०० | १,५०० |
| प्रति गट (२०हेक्टर) | ९०,००० | ३०,००० | ०.०० | ३०,००० | ३०,००० | ३०,००० |
| प्रति समुह (१५ गटांचे ३०० हे.) | १३,५०,००० | ४,५०,००० | ०.०० | **४,५०,०००** | ४,५०,००० | ४,५०,००० |

वर नमुद केल्याप्रमाणे प्रति हेक्टरी रू. ४,५००/- तीन वर्षासाठी निधीची तरतुद करण्यात आलेली आहे. प्रतिवर्षी प्रति हेक्टर रू. १,५००/- तरतुद उपलब्ध आहे. वर्ष २०२२-२३ म्हणजेच पहिल्या वर्षी निधीची तरतुद करण्यात आलेली नव्हती. सदर निधी हा प्रमाणिकरणासाठी वापरण्यात येणार आहे. रासायनिक शेतीचे सेंद्रिय

शेतीमध्ये रुपांतरण होण्यासाठी तीन वर्षाचा कालावधी लागतो. योजनेअंतर्गत तीन वर्षे प्रमाणिकरणाचे सी-१, सी-२ व सी-३ प्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे. वर्ष २०२२-२३ मध्ये प्रमाणिकरणाबाबत कार्यवाही केलेली नसल्याने हा कालावधी एक वर्ष पुढे म्हणजेच २०२५-२६ पर्यंत जाईल.

**याबाबीतून उपलब्ध होणारी तरतूद खालील घटकासाठी करावी-**

| अ.क्र. | घटक | अंमलबजावणी वर्ष | खर्चाचे मापदंड | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | अंतर्गत नियंत्रण निरीक्षक (ICS Inspector) | २०२३-२४<br>२०२४-२५<br>२०२५-२६ | मानधन प्रति महा रु. ५,०००/-<br>स्थानिक प्रवास खर्च प्रति महा रु. १,०००/-<br>मोबाईल डेटा प्रति महा रु. ५००/-<br>असे एकूण प्रति महा रु. ६,५००/- | ३ गटांकरिता एक याप्रमाणे अंतर्गत नियंत्रण निरीक्षक याप्रमाणे १५ गटांसाठी एका समुहात एकुण ५ अंतर्गत नियंत्रण निरीक्षक |
| २. | डेटा व्यवस्थापनासाठी MIS विकसित करुन त्याची अंमलबजावणी करणे | २०२३-२४<br>२०२४-२५<br>२०२५-२६ | अंतर्गत नियंत्रण निरीक्षक यांच्या मानधनाची रक्कम वजा जाता शिल्लक राहणारी रक्कम | ही बाब डॉ. पं.दे.जै. शे. मिशनमार्फत राबविण्यात येईल. |

## अंतर्गत नियंत्रण निरीक्षक" (ICS Inspector)-

या घटकाअंतर्गत ३ गटांकरिता एक याप्रमाणे "अंतर्गत नियंत्रण निरीक्षक" (ICS Inspector) नेमावयाचा आहे. अशारीतीने १५ गटांसाठी एका समुहात एकुण ५ "अंतर्गत नियंत्रण निरीक्षक" (ICS Inspector) यांची नेमणुक करावयाची आहे. या नेमणुका योजनेंतर्गत स्थापन करावयाच्या शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत करणे अभिप्रेत आहे म्हणुन समूहस्तरावर शेतकरी उत्पादक कंपनीची नोंदणी करण्याचे काम **प्राधान्याने त्वरीत पुर्ण करावे.** सेंद्रिय प्रमाणिकरणासाठीचा अर्ज शेतकरी उत्पादक कंपनीने "अपेडा" मान्यताप्राप्त राज्यस्तरावरून निश्चित केलेल्या प्रमाणिकरण यंत्रणेकडे करावयाचा असल्यानेही शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करणे अत्यंत गरजेचे आहे. शेतकरी उत्पादक कंपनी नोंदणीची कार्यवाही दि. २५ मे, २०२३ पर्यंत पुर्ण करून नियुक्त प्रमाणिकरण यंत्रणेकडे प्रमाणिकरणाबाबत अर्ज सादर करावा.

शेतकरी उत्पादक कंपनीची नोंदणी करण्यासाठी योजनेंतर्गत **“डी-४”** या घटकातुन रू. ४०,०००/- खर्च करण्याची तरतुद आहे. याबाबत पुढे सविस्तर माहिती डी-४ या घटकाबाबतच्या विवेचनात दिलेली आहे.

**अंतर्गत नियंत्रण निरीक्षक" (ICS Inspector) नेमणुकी संदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी-**

**नेमणूक कोणी करावी-** "अंतर्गत नियंत्रण निरीक्षक" यांची निवड ही शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत संबंधित प्रकल्प संचालक, आत्मा यांचे मान्यतेने करण्यात यावी.

- शेतकरी उत्पादक कंपनी अंतर्गत येणाऱ्या सर्व "अंतर्गत नियंत्रण निरीक्षकांवर" दैनंदिन कामकाजासाठी तज्ञ प्रशिक्षक व बीटीएम/एटीएम यांचे नियंत्रण राहील.

**पात्रता निकष-** निवड करताना कृषि पदविधर किंवा कृषि पदविकाधारक यांना प्राधान्य द्यावे. तसेच ते उपलब्ध न झाल्यास कोणत्याही शाखेचा पदविधर चालेल, तोही न मिळाल्यास किमान १२ वी उत्तीर्ण किंवा समकक्ष उमेदवार चालेल. नेमणुकीमध्ये कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात यावे.

**नेमणूक केंव्हापासून व मानधन-** शेतकऱ्यांच्या शेतावरील उत्पादनाच्या प्रमाणिकरणासाठी "अंतर्गत नियंत्रण निरीक्षकाची" नेमणुक दि. १ जुन, २०२३ पुर्वी करावी आणि त्यांना दि. १ जुन, २०२३ पासुन मानधन प्रति महा रु. ५,०००/-, स्थानिक प्रवास खर्च प्रति महा रु. १,०००/- व मोबाईल डेटा प्रति महा रु. ५००/- असे एकूण प्रति महा रु. ६,५००/- प्रमाणे रक्कम देय राहील.

- "अंतर्गत नियंत्रण निरीक्षक" यांना प्रती महा वरीलप्रमाणे मानधन योजनेअंतर्गत उपलब्ध निधीमधून अदा करण्यात यावे. (एका समुहाच्या ५ अंतर्गत नियंत्रण निरीक्षकासाठी एका वर्षासाठी रक्कम रू. ६,५०० X ५ X १२ = रू. ३,९०,०००/-).

**कालावधी-** "अंतर्गत नियंत्रण निरीक्षक" यांची निवड ही मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात योजना कालावधीपुरती जास्तीत जास्त तीन वर्षे करण्यात यावी. याकरिता सदर घटकांतर्गत प्रति समुह रु. ३.९० लाख प्रति वर्ष याप्रमाणे तीन वर्षासाठी तरतूद उपलब्ध आहे. कामकाजात सातत्य नसणाऱ्या, अपेक्षेप्रमाणे जबाबदाऱ्या पार न पाडणाऱ्या अंतर्गत नियंत्रण निरीक्षकास नोटीस देऊन कामात सुधारणा करण्याची संधी द्यावी आणि त्याउपरही सुधारणा न झाल्यास त्यांचे मानधन देणे त्वरीत थांबवून नेमणूक शेतकरी उत्पादक कंपनीने रद्द करावी. प्रकल्प संचालक, आत्मा यांनाही याबाबत शेतकरी उत्पादक कंपनीला सूचना देण्याचे अधिकार असतील व अपेक्षेप्रमाणे काम न करणाऱ्या निरीक्षकांचे मानधन थांबविण्याचे अधिकार असतील. नेमणूक रद्द केलेल्या निरीक्षकांऐवजी नवीन निरीक्षकाची नेमणूक शेतकरी उत्पादक कंपनी यांनी प्रकल्प संचालक, आत्मा यांच्या मान्यतेने करावी.

**अंतर्गत नियंत्रण निरीक्षक यांची जबाबदारी-**

**प्रत्येक अंतर्गत नियंत्रण निरीक्षकाने त्याला ज्या तीन गटांसाठी नेमले आहे त्या गटातील शेतकऱ्यांसाठी पुढीलप्रमाणे कामे करावीत -**

- शेतकऱ्यांना प्रमाणीकरण मानकांबाबत मार्गदर्शन करणे आणि त्यानुसार त्याचे पालन होत असल्याबाबत त्याची खात्री करणे.

- गटातील सर्व शेतकऱ्यांनी प्रमाणीकरणासाठी आवश्यक दैनंदिनी मध्ये नोंदी घेतल्याची खात्री करणे. प्रमाणीकरणासाठी तपासणी/निरीक्षण करणे, गटातील शेतकऱ्यांचे अहवाल कंपनीस्तरावरील प्रमाणीकरण समितीकडे देणे, ट्रेसनेट प्रणालीवर सदरचे अहवाल नोंदविणे.
- गटांचा पिक पेरा, पिकपद्धती, उत्पादित माल, आवक, प्रतवारी व इतर अनुषंगीक बाबीची माहिती देणे.

वरीलप्रमाणे सर्व जबाबदारी योग्यरित्या पार पाडण्याकरिता उपरोक्त कामांव्यतिरिक्त शेतकरी उत्पादक कंपनीस्तरावर **प्रमाणिकरण, विपणन, प्रापण, लेखा व प्रशासन आणि भांडारण** याप्रमाणे समिती स्थापन करण्यात याव्यात आणि प्रत्येक समितीवर एका अंतर्गत नियंत्रण निरीक्षकाची नेमणूक करावी. ज्या समितीत जो अंतर्गत नियंत्रण निरीक्षक आहे त्यांनी त्या समितीत समन्वयकाचे काम करावे.

## समितीचे प्रारूप, कार्य व जवाबदारी पुढीलप्रमाणे :

### अ. प्रमाणिकरण समिती

a. **अध्यक्ष-** संबधित क्लस्टर मधील तज्ञ प्रशिक्षक (MT)

b. **सदस्य** -

   i. शेतकरी उत्पादक कंपनीचे अध्यक्ष,
   ii. शेतकरी उत्पादक कंपनीचे उपाध्यक्ष,
   iii. शेतकरी उत्पादक कंपनीचे सचिव
   iv. अंतर्गत निरीक्षक-१

c. **कार्य व जवाबदारी**

   i. प्रमाणिकरणसाठी अर्ज करणे
   ii. अंतर्गत निरीक्षक यांच्याकडून गटाचे अंतर्गत निरीक्षण करून घेणे
   iii. अंतर्गत निरीक्षकांच्या अहवालावर निर्णय घेवून शेतकरी व गट बाद करणे
   iv. नवीन सदस्यांना मान्यता देणे
   v. Trace net प्रणालीवर माहिती भरणे
   vi. सर्व गटांना अंतर्गत नियंत्रण प्रणाली मापदंड उपलब्ध करून देणे व प्रत्येक वर्षी शेतकऱ्यांना शेती दैनंदिनी उपलब्ध करून देणे
   vii. प्रत्येक वर्षी प्रमाणिकरणाचे नुतनीकरण करणे
   viii. प्रमाणिकरण विषयक सर्व कामकाज पाहणे

### आ. विपणन समिती

a. **अध्यक्ष-** संबधित क्लस्टर मधील तज्ञ प्रशिक्षक (MT)

b. **सदस्य**

   i. दोन किंवा तीन संचालक व अंतर्गत निरीक्षक-२
   ii. अंतर्गत निरीक्षक-२ हा या समितीचा सदस्य सचिव असेल.

c. **कार्य व जबाबदारी**

   i. सेंद्रिय माल विक्री केंद्राचे कामकाज शेतकरी उत्पादक कंपनीच्या वतीने पाहणे
   ii. इतर शेतकरी उत्पादक कंपनींच्या संपर्कात राहून त्यांच्या मागणीप्रमाणे शेत मालाचा पुरवठा करणे
   iii. वाहतुकीची व्यवस्था करणे
   iv. उत्पादित होणाऱ्या मालाची माहिती ठेवणे.

**इ. प्रापण समिती :**

a. **अध्यक्ष-** संबधित क्लस्टर मधील तज्ञ प्रशिक्षक (MT)

b. सदस्य

   i. दोन किंवा तीन संचालक व अंतर्गत निरीक्षक-३
   ii. अंतर्गत निरीक्षक-३ हा या समितीचा सदस्य सचिव असेल.

c. कार्य व जबाबदारी

   i. शेतकऱ्यांचा माल विकत घेणे व त्यासाठी सर्व व्यवस्था करणे
   ii. शेतकऱ्यांच्या मालाची गुणवत्ता तपासणे
   iii. ग्रेड निहाय मालाची किंमत निश्चित करणे
   iv. मालाचे नमुना (Sample) काढून तपासणी साठी प्रयोशाळेत पाठविणे
   v. खरेदी केलेल्या मालाची माहिती भांडारण समिती व लेखा समितीला देणे

**ई. लेखा व प्रशासन समिती**

a. **अध्यक्ष-** संबधित क्लस्टर मधील तज्ञ प्रशिक्षक (MT)

b. **सदस्य**

   i. दोन किंवा तीन संचालक व अंतर्गत निरीक्षक-४
   ii. अंतर्गत निरीक्षक-४ हा या समितीचा सदस्य सचिव असेल व तो कंपनीचे प्रशासकीय कामकाज पाहिल व लेखाविषयक हिशेब ठेवेल

c. **कार्य व जबाबदारी**

   i. शेतकरी उत्पादक कंपनीचे लेखाविषयक सर्व कामकाज पाहणे.
   ii. खरेदी केलेल्या मालाचे पेमेंट करणे
   iii. शेतकरी उत्पादक कंपनीचे प्रशासकीय कामकाज पाहणे
   iv. शेतकरी उत्पादक कंपनीचे सर्व दस्ताऐवजांचे जतन करणे
   v. शेतकरी उत्पादक कंपनीचे लेखापरीक्षण करून घेणे

उ. **भांडारण समिती**

a. **अध्यक्ष**- संबधित क्लस्टर मधील तज्ञ प्रशिक्षक (MT)

b. **सदस्य**

i. दोन किंवा तीन संचालक व अंतर्गत निरीक्षक -५

ii. अंतर्गत निरीक्षक-५ हा या समितीचा सदस्य सचिव असेल.

c. **कार्य व जबाबदारी**

i. खरेदी केलेल्या मालाची व्यवस्थित ग्रेड निहाय साठवणूक करणे

ii. साठवणूक केलेल्या मालाच्या नोंदी ठेवणे

iii. साठवणुकीच्या वेळेस माल खराब होणार नाही यासाठीची सर्व व्यवस्था करणे

iv. साठवणूक केलेल्या मालाची माहिती विपणन समितीला देणे

v. मालाच्या चढ उतार साठीची व्यवस्था करणे

vi. मालाची स्वच्छता व प्रतवारी करणे

### माहिती व्यवस्थापन प्रणाली (MIS) -

डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशनमार्फत "अंतर्गत प्रोग्रामरची" नेमणुक करून शेतकरीस्तर ते शासनस्तरापर्यंत अहवाल प्राप्त होईल अशा पध्दतीने माहीती व्यवस्थापन प्रणाली (MIS) विकसित करावी. सदर प्रणालीत माहीती भरण्यासाठी विविधस्तरावर डॅशबोर्ड, जिओ टॅगिंग, जिओ फेंन्सिंग व इतर अनुषंगीक बाबींचा समावेश असावा. यासाठी येणारा खर्च बाब ए-२ मधून करण्यात येईल.

## ३. बाब- बी-१: सेंद्रिय प्रमाणिकरण- भौतिक तपासणी, प्रमाणपत्र तयार करणे व वितरण यासाठी सेवा शुल्क-

| स्तर | वर्षनिहाय उपलब्ध तरतुद (रुपये) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकुण तीन वर्षाकरिता तरतुद | पहिले वर्ष उपलब्ध तरतुद | पहिले वर्ष खर्च | दुसरे वर्ष तरतुद | तीसरे वर्ष तरतुद | चौथे वर्ष तरतुद |
| प्रति हेक्टर | २,१०० | ७०० | ०.०० | ७०० | ७०० | ७०० |
| प्रति गट (२०हेक्टर) | ४२,००० | १४,००० | ०.०० | १४,००० | १४,००० | १४,००० |
| प्रति समुह (१५ गटांचे ३०० हे.) | ६,३०,००० | २,१०,००० | ०.०० | २,१०,००० | २,१०,००० | २,१०,००० |

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार योजनेअंतर्गत बी-१ घटकांतर्गत पीजीएस-इंडिया पध्दतीने सेंद्रिय प्रमाणिकरण करणेसाठी तरतूद उपलब्ध आहे. तथापि, National Programme for Organic Production (NPOP) अंतर्गत तृतीय पक्षीय (थर्ड पार्टी) प्रमाणिकरणाचा पर्यायही राज्यास उपलब्ध आहे. पीजीएस-इंडिया पध्दतीने उत्पादीत सेंद्रिय प्रमाणित शेतमाल विक्रीस विश्वासार्हतेच्या अभावी अडचणी येतात व

मागणी कमी राहते. सद्यस्थितीत देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत तृतीय पक्षीय (थर्ड पार्टी) प्रमाणित केलेल्या उत्पादनांना मोठया प्रमाणात मागणी आहे. ही बाब लक्षात घेऊन योजनेंतर्गत प्रस्तावित क्षेत्राचे सेंद्रिय प्रमाणिकरण अपेडा मान्यता प्राप्त National Programme for Organic Production (NPOP) अंतर्गत तृतीय पक्षीय (थर्ड पार्टी) प्रमाणिकरण आयसीएस पध्दतीने करावयाचे आहे.

रासायनिक शेतीचे सेंद्रिय शेतीमध्ये रुपांतरण होण्यासाठी तीन वर्षाचा कालावधी लागतो. योजनेअंतर्गत तीन वर्षे प्रमाणिकरणाचे सी-१, सी-२ व सी-३ प्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे. वर्ष २०२२-२३ मध्ये प्रमाणिकरणाबाबत कार्यवाही केलेली नसल्याने हा कालावधी एक वर्ष पुढे म्हणजेच २०२५-२६ पर्यंत जाईल. प्रमाणीकरणाच्या कार्यवाहीबाबतचा तपशिल पुढे बाब- बी-२ नंतर सविस्तर मार्गदर्शन देण्यात आलेले आहे.

**बाब- बी-२: एनएबीएल मान्यताप्राप्त प्रयोगशाळांमध्ये क्षेत्रीय संस्था / राज्य विभागांद्वारे किड अंश विश्लेषणासाठी ३ नमुने प्रती गट प्रवर्तक क्षेत्र/दुसऱ्या वर्षापासून-**

| स्तर | वर्षनिहाय उपलब्ध तरतुद (रुपये) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकुण तीन वर्षाकरिता तरतुद | पहिले वर्ष उपलब्ध तरतुद | पहिले वर्ष खर्च | दुसरे वर्ष तरतुद | तिसरे वर्ष तरतुद | चौथे वर्ष तरतुद |
| प्रति हेक्टर | ६०० | ०.०० | ०.०० | ३०० | ३०० | ०.०० |
| प्रति गट (२०हेक्टर) | १२,००० | ०.०० | ०.०० | ६,००० | ६,००० | ०.०० |
| प्रति समुह (१५ गटांचे ३०० हे.) | १,८०,००० | ०.०० | ०.०० | ९०,००० | ९०,००० | ०.०० |

योजनेअंतर्गत बी-२ घटकांतर्गत किड अंश विश्लेषणासाठी १०० हे. क्षेत्रामधून प्रत्येकी ३ नमुने दुसऱ्या वर्षापासून काढून तपासणी करण्यासाठी ही तरतूद आहे. तथापि, तृतीय पक्षीय प्रमाणिकरण करण्यात येणार असल्याने आणि संबंधित प्रमाणिकरण यंत्रणेकडून त्यांना देय होणाऱ्या प्रमाणिकरण शुल्कामधूनच सदर किड अंश विश्लेषणाचे नमुने तपासणीकरिता काढले जाणार आहेत. त्यामुळे सदर घटकांतर्गत उपलब्ध असलेली तरतूद विभागामार्फत (प्रकल्प संचालक, आत्मा) खर्च करण्याची आवश्यकता नाही. याबाबीसाठी उपलब्ध होणारा निधी बाब-बी-२ बरोबर समायोजित करुन तृतीय पक्षीय प्रमाणिकरणासाठी खालील पध्दतीने उपयोगात आणावयाचा आहे.

**बी-१ व बी-२ या या घटकांची एकत्रित उपलब्ध होणारी एकुण ३ वर्षाची तरतूद रू. ८.१० लाख असून त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.**

| स्तर | वर्षनिहाय उपलब्ध तरतुद (रुपये) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकुण तीन वर्षाकरिता तरतुद | पहिले वर्ष उपलब्ध तरतुद | पहिले वर्ष खर्च | दुसरे वर्ष तरतुद | तीसरे वर्ष तरतुद | चौथे वर्ष तरतुद |
| प्रति हेक्टर | २,७०० | ७०० | ०.०० | १,००० | १,००० | ७०० |
| प्रति गट (२० हेक्टर) | ५४,००० | १४,००० | ०.०० | २०,००० | २०,००० | १४,००० |
| प्रति समुह (१५ गटांचे ३०० हे.) | ८,१०,००० | २,१०,००० | ०.०० | ३,००,००० | ३,००,००० | २,१०,००० |

**बी-१ व बी-२ या या घटकांची एकत्रित समुह स्तरावर उपलब्ध होणाऱ्या एकुण ३ वर्षाच्या रू. ८.१० लाख तरतूदीचा विनियोग पुढीलप्रमाणे अ व ब बाबीवर करावा**

**अ- NPOP अंतर्गत तृतीय पक्षीय (थर्ड पार्टि) प्रमाणिकरण**

**ब- तज्ञ प्रशिक्षक**

**अ) NPOP अंतर्गत तृतीय पक्षीय (थर्ड पार्टि) प्रमाणिकरण-**

योजनेंतर्गत प्रस्तावित क्षेत्राचे सेंद्रिय प्रमाणिकरण अपेडा मान्यता प्राप्त NPOP अंतर्गत तृतीय पक्षीय (थर्ड पार्टि) प्रमाणिकरण आयसीएस पध्दतीने करण्यात येईल. समुहस्तरावर स्थापित झालेली शेतकरी उत्पादक कंपनी ही "अंतर्गत नियंत्रण प्रणाली (ICS)" म्हणुन काम करेल व प्रकल्प संचालक, आत्मा हे "MANDATOR" राहतील. सदरचे प्रमाणीकरण हे भारत सरकारच्या **APEDA (अपेडा)** मान्यताप्राप्त व राज्यस्तरावरून निवड केलेल्या संस्थेकडून करण्यात यावे. सदर प्रमाणिकरण यंत्रणेबरोबर प्रकल्प संचालक, आत्मा हे करार करतील.

डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन मार्फत तृतीय पक्षीय (थर्ड पार्टि) प्रमाणिकरण यंत्रणा नियुक्तीसाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. सर्वात कमी शुल्क आकारणाऱ्या संस्थेने प्रति वर्षी रु. ८२,६००/- प्रति समुह दराची मागणी केली आहे. हे दर गृहीत धरुन पुढीलप्रमाणे खर्च करणे अपेक्षित आहे.

प्रमाणिकरण शुल्क संबंधित प्रमाणिकरण संस्थेस एका आर्थिक वर्षात दोन टप्यात देण्यात यावे. सेंद्रिय प्रमाणिकरण यंत्रणेची निवड होऊन करार झाल्यावर त्यांच्याकडुन ट्रेसनेट आयडी व पासवर्ड मिळाल्यानंतर शेतकरी उत्पादक कंपनी मार्फत प्रथम हप्ता (५०%) देण्यात यावा व स्कोप सर्टिफिकेट प्राप्त झाल्यानंतर द्वितीय हप्ता (उर्वरीत ५०%) देण्यात यावा. प्रमाणिकरणासाठी नियुक्त प्रमाणिकरण संस्थेस त्यांच्या निविदेच्या अधिन राहुन प्रति वर्षी प्रमाणिकरण शुल्क रू. ८२,६००/- याप्रमाणे तीन वर्षाकरीता रू. २,४७,८००/- देय आहे.

राज्यस्तरावरुन निवडण्यात आलेल्या प्रमाणीकरण यंत्रणेला देण्यात आलेल्या अटी व शर्तीनुसार प्रत्यक्ष काम होईल याबाबत खात्री करण्यात यावी.

रासायनिक शेतीचे सेंद्रिय शेतीमध्ये रुपांतरण होण्यासाठी तीन वर्षाचा कालावधी लागतो. योजनेअंतर्गत तीन वर्षे प्रमाणिकरणाचे सी-१, सी-२ व सी-३ प्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे. वर्ष २०२२-२३ मध्ये प्रमाणिकरणाबाबत कार्यवाही केलेली नसल्याने हा कालावधी एक वर्ष पुढे म्हणजेच २०२४-२५ पर्यंत जाईल. केंद्र शासनाची मान्यता घेऊन कालावधी वाढविण्यात आल्यानंतर निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

**ब) तज्ञ प्रशिक्षक-**

**नेमणूक कोणी करावी-**

- कंत्राटी तज्ञ प्रशिक्षकाची नेमणूक बाह्य स्त्रोताद्वारे समुह स्तरावरील शेतकरी उत्पादक कंपनीने प्रकल्प संचालक, आत्मा यांच्या मदतीने करावी.
- समुहस्तरावर शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना होईपर्यंत कंत्राटी तज्ञ प्रशिक्षकाची नेमणूक प्रकल्प संचालक, आत्मा यांनी करावी

**पात्रता निकष-**

- तज्ञ प्रशिक्षक हा किमान कृषि पदवीधर अथवा पदविकाधारक असावा. अपवादात्मक परिस्थितीत संबंधित प्रकल्प संचालक, आत्मा यांच्या मान्यतेने सेंद्रिय शेती तज्ञ असलेल्या इतर पदविधारकाची निवड करता येईल.

**मानधन-**

"तज्ञ प्रशिक्षक" यांचे मानधन (जी.एस.टी. सह प्रति महा मानधन रू. १५०००/- + पी.टी.ए. रू. २०००/- असे एकुण रू. १७,०००/-) देण्याकरीता वापरण्यात यावा. सदरचे मानधन शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत तज्ञ प्रशिक्षकाला देण्यात यावे. तथापि समूहस्तरावर शेतकरी उत्पादक कंपनींची स्थापना होईपर्यंत या मानधनाची अदायगी प्रकल्प संचालक, आत्मा यांनी करावी. सदरील खर्च हा प्रमाणिकरणासाठी अर्थसहाय्य या घटकाअंतर्गत एकुण उपलब्ध तरतूदीच्या अधिन राहुन करण्यात यावा.

**तज्ञ प्रशिक्षकाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या:-**

- शेतकरी उत्पादक कंपनीची (FPC) स्थापना (नोंदणी, बँक खाते) व इतर अनुषंगिक बाबींची पूर्तता करणे
- गटातील शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती संदर्भात पिक संवर्धन, पिक संरक्षण, सेंद्रिय प्रमाणिकरण इ. प्रशिक्षण देणे व मार्गदर्शन करणे.
- सेंद्रिय प्रमाणिकरणासाठी आवश्यक डेटा अंतर्गत निरिक्षक यांचे सहकार्याने संगणकावर अद्ययावत करणे
- अधिनस्त असलेल्या सर्व गटांचा पिक पेरणी अहवाल, उपलब्ध माल व गुणवत्ता इत्यादीची अचूक माहिती वेळोवेळी शेतकरी उत्पादक कंपनीला व जिल्हास्तरीय आत्मा कार्यालयास सादर करणे.
- शेतकरी उत्पादक कंपनीकरिता व्यवसाय आराखडा व प्रकल्प अहवाल तयार करणे.
- शेतकरी उत्पादक कंपनीच्या सर्व व्यवहारच्या नोंदी घेणे.
- शेतकरी उत्पादक कंपनीच्या सर्व संचालक मंडळातील सदस्यांची मासिक बैठक घेणे.
- तृतीय पक्षिय सेंद्रिय प्रमाणिकरण अंतर्गत प्रमाणिकरणासाठी शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) स्तरावर अंतर्गत नियंत्रण प्रणाली (ICS) विकसित करणे व अंतर्गत निरीक्षकांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे तसेच शेतकरी उत्पादक कंपनीच्या प्रमाणिकरण समितीचा अध्यक्ष म्हणून कार्य करणे.
- सेंद्रिय प्रमाणिकणासाठी आवश्यक सर्व माहिती संबंधित यंत्रणेस व सेंद्रिय प्रमाणिकरण यंत्रणा यांना उपलब्ध करून देणे तसेच तृतीय पक्षिय प्रमाणीकरण यंत्रणेच्या पोर्टल वरील कार्य जसे नोंदणी, अर्ज, पिक पेरा इत्यादी अनुषंगिक बाबी वेळेत पूर्ण करणे तसेच त्रुटींची पूर्तता करणे.
- समूहातील उत्पादित होणाऱ्या मालाची माहिती शेतकरी उत्पादक कंपनी स्तरावरून अधिकाऱ्यांना देणे .
- सेंद्रिय माल विक्री केंद्र स्थापित करून विक्री सुरू करणे व त्याचे दैनंदिन कामकाज पाहण्यास सहकार्य करणे.
- तज्ञ प्रशिक्षकाने समूहाच्या ठिकाणी वास्तव्यास असणे बंधनकारक असेल.

**३.बाब- सी.१: सेंद्रीय शेतीमध्ये रूपांतरण, निविष्ठा, शेतात सेंद्रिय निविष्ठा निर्मितीसाठी पायाभूत सुविधा यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान (डीबीटीद्वारा) -**

| स्तर | वर्षनिहाय उपलब्ध तरतुद (रुपये) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकुण तीन वर्षाकरिता तरतुद | पहिले वर्ष उपलब्ध तरतुद | पहिले वर्ष खर्च | पहिले वर्ष शिल्लक | दुसरे वर्ष तरतुद | तिसरे वर्ष तरतुद |
| प्रति हेक्टर | ३१,००० | १२,००० | १०,३०० | १,७०० | ११,७०० | ९,००० |
| प्रति गट (२० हेक्टर) | ६,२०,००० | २,४०,००० | २,०६,००० | ३४,००० | २,३४,००० | १,८०,००० |
| प्रति समुह (१५ गटांचे ३०० हे.) | ९३,००,००० | ३६,००,००० | ३०,९०,००० | ५,१०,००० | ३५,१०,००० | २७,००,००० |

टिप - वर्ष २०२२-२३ मध्ये या घटकावर मापदंडानुसार पहिल्या वर्षातील रू. १२,०००/- पैकी प्रति हेक्टरी रू. १०,३००/- उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. उर्वरीत निधी रू. १,७००/- व दुसऱ्या वर्षातील मापदंडानुसार रू. १०,०००/- असे एकुण रू. ११,७००/- निधी खर्च करण्यासाठी दुसऱ्या वर्षात उपलब्ध आहेत.

केंद्र शासनाच्या परंपरागत कृषी विकास योजना अंतर्गत योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनूसार सेंद्रिय निविष्ठा निर्मिती व वापर या घटकाकरिता प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाकरिता प्रति हेक्टर अनुक्रमे रु. १२,०००/-, रु. १०,०००/- व रु. ९,०००/- याप्रमाणे तीन वर्षात एकुण रू. ३१,०००/- अनुदान देय आहे.

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये राज्यस्तरावरून उपलब्ध करून दिलेल्या निधीतुन मृद नमुने तपासणे, शेताच्याकडेने चर काढणे अथवा बांध घालणे, हिरवळीच्या खतासाठी बियाणे खरेदी, कंपोस्ट खताचे डेपो लावणे, जमिनिमध्ये सुक्ष्म जीवजंतुचे प्रमाण वाढविण्यासाठी स्थानिकरित्या विविध कल्चर निर्मिती करण्यासाठी साहीत्य खरेदी (ड्रम व कल्चर खरेदी) याकरिता प्रति हेक्टर रू. १०,३००/- एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून त्यामधून बहुतांशी जिल्हयांनी खर्च केलेला आहे. तथापि काही जिल्ह्यांमध्ये पीएफएमएसच्या अथवा इतर तांत्रिक अडचणींमुळे खर्च झाला नसल्याचे दिसुन येते. तरी ज्या जिल्हयांनी सदर बाबींवर खर्च केलेला नाही त्यांनी सदर बाबी राबवुन त्या बाबींवर वर्ष २०२३-२४ मध्ये खर्च करावा.

**वर्ष २०२३-२४ मध्ये उपलब्ध होणाऱ्या रु. ११,७००/- प्रती हेक्टरी तरतूदीमधून पुढील बाबी राबविण्यात याव्यात-**

**अ) समुहस्तरावर (शेतकरी उत्पादक कंपनी) स्वनिर्मित जैविक निविष्ठा संसाधन केंद्र -**

शेतकरी उत्पादक कंपनीस्तरावर “स्वनिर्मित जैविक निविष्ठा संसाधन केंद्र” स्थापित करावयाचे असून याकरीता रू. ५.०० लाख इतक्या निधीची आवश्यकता भासणार आहे.

याकरिता सी-१ या घटकांतर्गत वर्ष २०२२-२३ मध्ये पहिल्या वर्षाचा प्रति हेक्टर मापदंड रु. १२,०००/- मधून रु. १०,३००/- एवढा खर्च वजा जाता उर्वरित शिल्लक प्रति हेक्टर रू. १,७००/- एवढा निधी शिल्लक राहीलेला आहे. याप्रमाणे एका समुहासाठी ३०० हे. X रू. १७०० = रू. ५,१०,०००/- एवढया निधीतुन

रु. ५.०० लाखाचे “स्वनिर्मित जैविक निविष्ठा संसाधन केंद्र” स्थापन करावे. हे केंद्र स्थापन करणेसाठी लागणारी जागा, उपकरणे,साहीत्य इत्यादी बाबतचा तपशील स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

**ब) सेंद्रीय शेतीमध्ये रूपांतरणासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान-**

वर्ष २०२३-२४ अंतर्गत या घटकामध्ये दुसऱ्या वर्षासाठी प्रति हेक्टरी रू. १०,०००/- निधी उपलब्ध आहे. सदर उपलब्ध निधीतुन मागील वर्षी राबविण्यात आलेले घटक वगळुन इतर घटक खालील परिशिष्टाप्रमाणे राबवायचे आहेत. बाब क्र. १ मधील जैविक कुंपण ही बाब मागील वर्षी राबविण्यात आलेली नसल्याने यावर्षात राबविणे बंधनकारक असून इतर शिल्लक बाबी निधी मर्यादेचे अधिन राहून राबविण्यात याव्यात. जादा येणारा खर्च शेतकऱ्यांनी स्वत: करावा.

**परिशिष्ट**

| अ. क्र. | बाब | वर्ष २०२३-२४ अपेक्षित खर्च (रु.) | वर्ष २०२४-२५ अपेक्षित खर्च (रु.) | अनुदान कोणाला द्यावे |
|---|---|---|---|---|
| | **सेंद्रिय शेती रुपांतरणासाठी करावयाच्या उपाययोजना** | | | |
| १. | **मृदा नमुना तपासणी**- शेतकऱ्याने शेतातुन योग्य पध्दतीने मृदा नमुना काढून तपासावा. पहिले वर्षी पेरणी पुर्व नमुने तपासावेत. दुसरे आणि तिसरे वर्षी फक्त काढणी पश्चात एक असे एकूण ३ नमुने तपासावेत. मृदा नमुने प्राधान्यक्रमाने कृषि विभाग, कृषि विद्यापिठ, कृषि विज्ञान केंद्राच्या प्रयोगशाळा मध्ये विश्लेषण करण्यात यावेत. | ३००/- | ३००/- | प्रकल्प संचालक, आत्मा यांचेस्तरावरुन शासकीय मृद चाचणी प्रयोगशाळेस अदा करण्यात यावे. |
| २. | **जैविक कुंपण**- शेजारील शेतातील रसायनांच्या फवारणीचे प्रदुषण जैविक शेतीत होऊ नये म्हणून शेताच्या कडेने उंच वाढणाऱ्या वनस्पतीची सघन पद्धतीने लागवड करावी | १,२५०/- | १,२५०/- | शेतकऱ्याला डीबीटी व्दारे<br>पुरावा- शेतकऱ्याचे स्वयं घोषणापत्र व त्यावर क्षेत्रीय कर्मचाऱ्याची प्रती स्वाक्षरी. |
| ३. | **चर खोदणे** | - | - | वर्ष २०२२-२३ मध्ये अनुदान दिलेले आहे. |

| अ. क्र. | बाब | वर्ष २०२३-२४ अपेक्षित खर्च (रु.) | वर्ष २०२४-२५ अपेक्षित खर्च (रु.) | अनुदान कोणाला द्यावे |
|---|---|---|---|---|
| ४. | हिरवळीच्या खतांची पिक लागवड करणे. हिरवळीच्या खताच्या पिका नुसार विद्यापीठाने केलेल्या शिफारशीनुसार बियाणे वापरावे उदा. ताग, ढेंचा इत्यादी. तसेच बियाणे तयार करुन पुढे वापरावे. महाबिज अथवा राष्ट्रीय बीज निगम यांचे कडुन बियाणे उपलब्ध करून घ्यावे. | -- | २,५००/- | प्रकल्प संचालक, आत्मा यांचेस्तरावरुन महाबिज अथवा राष्ट्रीय बीज निगम यांना अदा करण्यात यावे. |
| ५. | विविध कंपोस्ट पध्दतीचा अवलंब करुन सेंद्रिय घटक कुजवून खत निर्मिती करणे. उदा. नाडेप, बायोडायनॅमिक कंपोस्ट, व्हर्मिकंपोस्ट. इत्यादी.<br>नाडेप टाके व गांडुळ खत यूनिट शासनाच्या MGNREGA (म.ग्रा.रो. ह.यो.) व इतर योजनेतून अभिसरणाव्दारे (Convergence) मधून बांधावे व त्याचा वापर करावा.<br>किंवा<br>बायोडायनॅमीक व इतर पध्दतीने कमीत कमी एकरी १५*६*४ फुट उंचीचे किमान ३ ढीग कंपोस्ट तयार केल्यास त्या शेतकऱ्यास या बाबीचा लाभ देता येईल. | २,५००/- | २,५००/- | शेतकऱ्याला डीबीटी व्दारे<br>पुरावा- शेतकऱ्याचे स्वयं घोषणापत्र व त्यावर क्षेत्रीय कर्मचाऱ्याची प्रती स्वाक्षरी. |
| ६. | **बीज प्रक्रिया आणि शेतीत अन्य पध्दतीने वापरासाठी**<br>जैविक खते/ निविष्ठा उदा. जैवीक संघ (Liquid Consortia), रायझोबीयम ; स्फुरद विरघळणारे जिवाणु ; पोटॅश मोबीलायझींग बॅक्टेरीया, ॲझोटोबॅक्टर इ. तसेच Trichoderma सारखे जैविक बुरशी | १,२५०/- | १,२५०/- | शेतकरी गटाला डीबीटी व्दारे प्रकल्प संचालक, आत्मा अदा करतील.<br>पुरावा- गटाने निविष्ठा खरेदी केल्याबाबत आणि त्याचा पुरवठा झाल्याबाबत कागदपत्रे (पुरवठा आदेश व बील) |

| अ. क्र. | बाब | वर्ष २०२३-२४ अपेक्षित खर्च (रु.) | वर्ष २०२४-२५ अपेक्षित खर्च (रु.) | अनुदान कोणाला द्यावे |
|---|---|---|---|---|
| | नाशके व यांची खरेदी कृषि विद्यापिठ, कृषि विज्ञान केंद्र, कृषि विभाग प्रयोगशाळा यांचे कडुन घ्यावी. | | | खरेदी केलेल्या निविष्ठा गटामार्फत शेतकऱ्यांना त्यांच्या क्षेत्राच्या प्रमाणात वाटप कराव्यात. |
| ७. | शेतकऱ्याच्या शेतावर जिवामृत व बीजामृत निर्मिती व वापर | २,५००/- | -- | शेतकऱ्याला डीबीटी व्दारे पुरावा- शेतकऱ्याचे स्वयं घोषणापत्र व त्यावर क्षेत्रीय कर्मचाऱ्याची प्रती स्वाक्षरी. |
| ८. | **पिक संरक्षणासाठी करावयाच्या उपायोजना**<br>किड व रोग नियंत्रणासाठी स्वनिर्मित वनस्पतीजन्य अर्क, बायोडायनॅमिक तरल किडरोधक निर्मिती व वापर | २,२००/- | १,२००/- | शेतकऱ्याला डीबीटी व्दारे<br>पुरावा- शेतकऱ्याचे स्वयं घोषणापत्र व त्यावर क्षेत्रीय कर्मचाऱ्याची प्रती स्वाक्षरी. |
| | **एकूण** | १०,०००/- | ९,०००/- | -- |

i) उपरोक्त प्रमाणे अ.क्र. १ व ४ साठीचा खर्च प्रकल्प संचालक, आत्मा स्तरावरुन अदा करण्यात येईल. (वर्ष २०२३-२४ मध्ये रु. ३००/- व वर्ष २०२४-२५ मध्ये रु. २,८००/-)

ii) उपरोक्त प्रमाणे अ.क्र. २, ५, ७ व ८ साठीचा खर्च शेतकऱ्याला डीबीटी व्दारे केलेल्या कामाच्या प्रमाणात अदा करण्यात येईल (वर्ष २०२३-२४ मध्ये रु. ८,४५०/- व वर्ष २०२४-२५ मध्ये रु. ४,९५०/-). शेतकऱ्याने क्षेत्रीय कर्मचाऱ्याच्या प्रति स्वाक्षरीसह द्यावयाच्या स्वयं घोषणापत्राचा नमुना सोबत सहपत्रीत केला आहे.

iii) उपरोक्त प्रमाणे अ.क्र. ६ साठीचा खर्च शेतकरी गट स्तरावरुन खर्च होईल व अनुदान गटाला अदा करण्यात येईल. (वर्ष २०२३-२४ मध्ये रु. १,२५०/- व वर्ष २०२४-२५ मध्ये रु. १,२५०/-).

**४. बाब – डी – मूल्यवृद्धी, विपणन आणि प्रसिद्धी – Value addiation, marketing and publicity**

डी-१ : विपणनासाठी सहाय्य , सामुहिक पॅकिंग , ब्रॅडिंग , जागा ,वाहतुक इ.

| स्तर | वर्षनिहाय उपलब्ध तरतुद (रुपये) | | | |
|---|---|---|---|---|
| | एकुण तीन वर्षाकरिता तरतुद | पहिले वर्ष उपलब्ध तरतुद | दुसरे वर्ष तरतुद | तिसरे वर्ष तरतुद |
| प्रति हेक्टर | १,५०० | ०.०० | ५०० | १,००० |
| प्रति गट (२०हेक्टर) | ३०,००० | ०.०० | १०,००० | २०,००० |
| प्रति समुह (१५ गटांचे ३०० हे.) | ४,५०,००० | ०.०० | १,५०,००० | ३,००,००० |

**डी-२ : एफपीसी / एफपीओ मार्फत मुल्यवृध्दी व पायाभूत सुविधा निर्मिती**

| स्तर | वर्षनिहाय उपलब्ध तरतुद (रुपये) | | | |
|---|---|---|---|---|
| | एकुण तीन वर्षाकरिता तरतुद | पहिले वर्ष उपलब्ध तरतुद | दुसरे वर्ष तरतुद | तिसरे वर्ष तरतुद |
| प्रति हेक्टर | २,००० | ०.०० | १००० | १००० |
| प्रति गट (२०हेक्टर) | ४०,००० | ०.०० | २०,००० | २०,००० |
| प्रति समुह (१५ गटांचे ३०० हे.) | ६,००,००० | ०.०० | ३,००,००० | ३,००,००० |

डी-३ : ब्रँड तयार करणे, विक्री मेळावा, प्रदर्शन, स्थानिक प्रसिद्धी, सेंद्रीय बाजार/मेला, स्थानिक मार्केटिंग पुढाकार, राष्ट्रीय व्यापार मेळाव्यामध्ये सहभाग

| स्तर | वर्षनिहाय उपलब्ध तरतुद (रुपये) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकुण तीन वर्षाकरिता तरतुद | पहिले वर्ष उपलब्ध तरतुद | पहिले वर्ष खर्च | पहिले वर्ष शिल्लक | दुसरे वर्ष तरतुद | तिसरे वर्ष तरतुद |
| प्रति हेक्टर | ५,३०० | १,३०० | ०.०० | १,३०० | २,००० | २,००० |
| प्रति गट (२०हेक्टर) | १,०६,००० | २६, ००० | ०.०० | २६,००० | ४०,००० | ४०,००० |
| प्रति समुह (१५ गटांचे ३०० हे.) | १५,९०,००० | ३,९०,००० | ०.०० | ३,९०,००० | ६,००,००० | ६,००,००० |

- एका समुहासाठी एकुण तीन घटकांची डी-१ ची रु. ४.५० लाख, डी-२ ची रु. ६.०० लाख व डी-३ ची रु. १५.९० लाख अशी एकूण रू. २६.४० लाख तरतुद उपलब्ध आहे.

**उपरोक्त तरतूदीतून तूर्त खालील बाबीवर खर्च करावा-**

| अ.क्र. | घटक | तरतूद रु. लाख | खर्चाच्या बाबी | शेरा |
|---|---|---|---|---|
| डी-१ | शेतकरी उत्पादक कंपनी स्थापनेसाठी सहाय्य | ०.४० | कंपनी नोंदणी शुल्क, कंपनी सेक्रेटरी शुल्क आणि अनुषंगिक खर्च | |
| डी-२ | कंपनी भागधारक शेतकऱ्यांना कंपनीचे भाग खरेदी करण्यासाठी सहाय्य (Equity Share) | ६.०० | कंपनीचे भाग खरेदी करणेसाठी प्रति भागधारक शेतकरी प्रति हेक्टर अधिकतम रु. २,०००/- | |
| | एकूण | ६.४० | -- | |

उपलब्ध एकूण तरतूद रु. २६.४० लाख मधून उपरोक्त घटकांसाठी रु. ६.४० लाख वगळता उर्वरित रु. २०.०० लाख तरतूदीतून स्थापन समुह संकलन केंद्र, बाजार व्यवस्था इत्यादी बाबत स्वतंत्र सूचना निर्गमित करण्यात येतील.

**डी-१ शेतकरी उत्पादक कंपनी नोंदणी-**

सेंद्रिय प्रमाणिकरण करण्यासाठी या योजनेत शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करणे बाबत या मर्गदर्शक सुचनेत बाब क्र ए-२ मध्ये नमुद करण्यात आले आहे. हि कंपनी विपणन ब्रॅड निर्मीती यासाठी सुध्दा आवश्यक आहे. अशा कंपनीच्या नोंदणीसाठी रक्कम रु. ०.४० लाख पर्यंत अर्थसहाय्य या घटकातुन देण्यात यावे . या तरतुदीतुन कंपनी सेक्रेटरीचे (CS) शुल्क आणि कंपनी स्थापण्यासाठी येणारा खर्च भागवावा . हे अनुदान प्रकल्प संचालक, आत्मा यांनी समुहांतर्गत स्थापित एका गटाला आदा करावे आणि या गटाने कंपनी स्थापनेसाठी पुढाकार घेऊन हा खर्च करावा. कंपनी स्थापन करण्यासाठी बीटीएम/एटीएम आणि तज्ञ प्रशिक्षक यांनी आवश्यक सहाय्य पुढाकार घेणाऱ्या गटाला द्यावे. प्रमाणिकरण यंत्रणेकडे अर्ज करणे, अंतर्गत नियंत्रण निरीक्षक नेमणे इत्यादी कामांसाठी शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना करणे ही अत्यावश्यक बाब आहे. म्हणून कंपनीची स्थापना त्वरीत करावी. सुरुवातीला पुढाकार घेणारे कंपनी संचालक ठरवुन कंपनीची नोंदणी करावी आणि प्रमाणिकरणासाठी त्वरीत अर्ज करावा. अन्य भागधारक शेतकऱ्यांचा समावेश टप्प्या टप्प्याने करण्यास हरकत नाही.

योजनेअंतर्गत कार्यक्षेत्रात यापूर्वीच कार्यरत असलेल्या शेतकरी उत्पादक कंपनी मार्फत योजना राबविण्यात येत असल्यास डी-१ बाबीवर खर्च करण्याची आवश्यकता नाही.

डी-२ कंपनी भागधारक शेतकऱ्यांना कंपनीचे भाग खरेदी करण्यासाठी सहाय्य (Equity Share) -

इक्विटी शेअर साठी एका शेतकऱ्याने रक्कम रु. २०००/- किंवा त्यापेक्षा जास्त समभाग घेतल्यास प्रति शेतकरी जास्तीत जास्त रक्कम रु १०००/- किंवा प्रति कंपनी जास्तीत जास्त रक्कम रु. ३.०० लाख इक्विटी शेअर साठी अर्थसहाय्य देण्यात येईल.

शेतकरी उत्पादक कंपनीमध्ये शेतकरी संख्या ३०० पेक्षा जास्त असल्यास रु. ६.०० लाख मर्यादेतच शेतकऱ्यांच्या जमा होणाऱ्या शेअर्सच्या प्रमाणात इक्विटी शेअर देण्यात यावेत.

“केंद्र पुरस्कृत १०,००० शेतकरी उत्पादक कंपनी गठण व संवर्धन” या योजनेंतर्गत स्थापित झालेल्या शेतकरी उत्पादक कंपनीच्या नोंदणीसाठी तसेच शेतकरी उत्पादक कंपनीकरीता इक्विटी शेअरचा लाभ देय आहे. त्यामुळे सदर योजनेंतर्गत स्थापित झालेल्या शेतकरी उत्पादक कंपनीच्या नोंदणीसाठी रक्कम रु. ०.४० लाख तसेच शेतकरी उत्पादक कंपनीला रक्कम रु. ६.०० लाख इक्विटी शेअरचा लाभ देय राहणार नाही. तसेच सदर योजनेंतर्गत मुख्य कार्यकारी अधिकारी यांची नेमणुक करावयाची असल्याने त्याठिकाणी तज्ञ प्रशिक्षकाची नियुक्ती करण्यात येऊ नये. मुख्य कार्यकारी अधिकारीच तज्ञ प्रशिक्षकाचे कार्य करतील.

**शेतकरी उत्पादक कंपनी (Farmer Producer Company- FPC) :-**

समूहातील सर्व गटातील सर्व शेतकरी हे शेतकरी उत्पादक कंपनीचे (FPC) चे भागधारक सभासद असतील. शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) ही गटांसाठी मार्गदर्शन केंद्र म्हणून कार्य करेल.

**शेतकरी उत्पादक कंपनीची जबाबदारी पुढीलप्रमाणे :**

- समूह संकलन केंद्रावर करावयाच्या सुविधा निश्चित करणे
- समूह संकलन केंद्राचे दैनंदिन कामकाज पाहणे
- खरेदीदार सोबत विक्रीचे करार करणे व मालाच्या पुरवठ्याची हमी देणे.
- शेतकऱ्यांचा माल खरेदी करणे.
- शेतकऱ्यांचा माल खरेदी करताना मालाची गुणवत्ता तपासणे
- शेतकऱ्यांना मालाचे पेमेंट करणे (धनादेश द्वारे गटाच्या बँक खात्यात जमा करणे)
- खरेदी केलेल्या मालाची साठवणूक करणे व साठवणूक केलेल्या मालाची निगा राखणे
- मालाची वाहतूक व्यवस्था करणे
- विक्री केंद्राचे दैनंदिन कामकाज पाहणे.
- बँकेकडून वित्त पुरवठा उपलब्ध करून देणे.
- सेंद्रिय प्रमाणिकरणमध्ये अंतर्गत नियंत्रण प्रणाली (ICS) म्हणून काम करणे
- प्रत्येक महिन्याला संचालक, गट प्रवर्तक, तज्ञ प्रशिक्षक व सेवा प्रदाता संस्था यांच्या बरोबर सभा घेणे
- खरेदीदाराच्या मागणीप्रमाणे पिकांचे नियोजन करणे
- शेतकऱ्यांच्या व गटांच्या मागणीप्रमाणे निविष्ठांचे नियोजन करणे
- जैविक निविष्ठा निर्मिती केंद्राची स्थापना करणे.

शेतकरी उत्पादक कंपनी ही तृतीय पक्षीय प्रमाणीकरण करिता अंतर्गत प्रमाणीकरण यंत्रणा (ICS) म्हणून काम करेल. समूहातील सर्व शेतकऱ्यांचे प्रमाणीकरणाची जबाबदारी ही शेतकरी उत्पादक कंपनीची राहील. अंतर्गत प्रमाणीकरण यंत्रणे अंतर्गत सर्व शेतकऱ्यांच्या प्रमाणीकरणाच्या दृष्टीने नोंदणी, पिक पेरा, पिक उत्पादन आराखडा, अंतर्गत तथा बाह्य निरीक्षणे, इत्यादी सर्व पूर्ण करण्याची जबाबदारी शेतकरी उत्पादक कंपनीची राहील.

## योजनेचे सनियंत्रण व मुल्यमापन-

योजनेची अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनांप्रमाणे होते किंवा नाही याची तपासणी करणे. चुकीची दुरुस्ती करणे आणि अनियमितता झाल्यास त्यावर कार्यवाही करणेसाठी योजनेचे सनियंत्रण व मुल्यमापन करणे अत्यंत आवश्यक आहे. त्याद्दष्टीने योजनेची अंमलबजावणी सुरु असतांना नियमित सनियंत्रण (Concurrent evaluation) आणि ठराविक कालावधीमध्ये सनियंत्रण व मुल्यमापन (Periodic Monitoring & Evaluation) होणे आवश्यक आहे. त्याशिवाय योजनेचे प्रगती अहवाल नियमितपणे सादर करणे अपेक्षित आहे. त्यासाठी ऑनलाईन MIS प्रणाली डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन मार्फत विकसित करण्यात येईल आणि ऑफलाईन पाठवावयाच्या मासिक अहवालाचे प्रपत्र स्वतंत्रपणे देण्यात येतील.

**नियमित (Concurrent) सनियंत्रण**- यासाठी योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी खालीलप्रमाणे तपासणी करावी.

| अ.क्र. | कर्मचारी/अधिकारी | तपासणीचे प्रमाण |
|---|---|---|
| १. | क्षेत्रीय कर्मचारी बीटीएम | समुहातील १०० टक्के बाबी आणि प्रत्येक आठवडयात समुहाला किमान एक भेट |
| २. | प्रकल्प उपसंचालक (आत्मा) | प्रत्येक महिन्यात समुहाला एक भेट आणि किमान दोन गटांची तपासणी |
| ३. | प्रकल्प संचालक (आत्मा) | समुहाला दोन महिन्यातून एक भेट आणि किमान दोन गटांची तपासणी |
| ४. | अधिक्षक कृषि अधिकारी विभागीय कृषि सहसंचालक कार्यालय | तीन महिन्यातून कार्यक्षेत्रातील किमान एका समुहाला भेट आणि किमान एका गटाची तपासणी |
| ५. | प्रकल्प संचालक, डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन | प्रत्येक महिन्यातून कार्यक्षेत्रातील किमान एका समुहाला भेट आणि किमान एका गटाची तपासणी |
| ६. | विभागीय कृषि सहसंचालक | तीन महिन्यातून कार्यक्षेत्रातील किमान एका समुहाला भेट आणि किमान एका गटाची तपासणी |

प्रकल्प उपसंचालका पासून वरील वरीष्ठ अधिकाऱ्यांनी भेटी अंती तपासणी टिपणी काढावी आणि ती आपल्या दैनंदिनी सोबत जोडावी. काही अनियमितता आढळल्यास अथवा योजना अंमलबजावणीतील येणाऱ्या अडचणी व त्यावर मात करण्यासाठी सुधारणा सुचविणेसाठी टिपणी असल्यास ती कृषि संचालक (आत्मा) यांना सादर करावी. ठराविक कालावधीतील सनियंत्रण व मुल्यमापन यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन मार्फत एजन्सी नेमणे अथवा अंतर्गत व्यवस्थेच्या माध्यमातून सनियंत्रण व मुल्यमापन केले जाईल.

------------------------------